**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः 05.10.2023** **वारः गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी प्रति सिलेंडर अनुदानात शंभर रुपयांची वाढ,

भारतीय नौदलात नवोन्मेष आणि स्वदेशीकरणासाठी द्वितीय 'स्वावलंबन' कार्यक्रमाचा आरंभ

रसायनशास्त्रातील यंदाचं नोबेल पारितोषिक क्वांटम डॉट्सच्या शोधासाठी अमेरिकेतील तीन शास्त्रज्ञांना जाहीर

सिक्कीममधील पुरात 14जणांचा मृत्यू 102 जण बेपत्ता

आयसीसी मर्यादीत षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा आजपासून आरंभ

आणि

आशियाई क्रिडा स्पर्धेत अकराव्या दिवशी भारतीय खेळाडूंना बारा पदकं, 81 पदकांसह भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर

**मंत्री मंडळ**

केंद्र सरकारनं प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी प्रति सिलेंडर अनुदानात शंभर रुपयांची वाढ केली असून, ते सध्याच्या 200 रुपयांवरून 300 रुपये करण्यात आल्याची माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी काल नवी दिल्लीत बातमीदारांना दिली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती देताना ते म्हणाले की तेलंगण आणि आंध्र प्रदेश यांच्यातील पाणीप्रश्नावरील निर्णयासाठी आंतरराज्य नदी जल विवाद कायदा, 1956 अंतर्गत कृष्णा जल विवाद न्यायाधिकरण दोनच्या संदर्भातील अटीही मंजूर केल्या आहेत. हा वाद मिटल्यामुळं दोन्ही राज्यांमध्ये विकासाचे नवे मार्ग खुले होतील, असंही ठाकूर म्हणाले.तेलंगणमध्ये सम्माक्का सारक्का केंद्रीय आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी केंद्रीय विद्यापीठ कायदा, 2009 मध्ये सुधारणा करण्यासही सरकारनं मान्यता दिली आहे. मुलुगु जिल्ह्यात 889 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून या विद्यापीठाची स्थापना केली जाणार आहे. सरकारनं हळदीचा खप आणि निर्यात तसंच जागरूकता वाढवण्यासाठी राष्ट्रीय हळद मंडळाची स्थापना

करण्याबाबतही  अधिसूचना काढली आहे, तसंच तुरडाळीची निर्यात 2030 पर्यंत सध्याच्या 1600 कोटी रुपयांवरून एक अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं सरकारचं लक्ष्य आहे, असंही ठाकूर यांनी यावेळी सांगितलं.

**रक्षामंत्री**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नौदलाच्या अद्ययावतीकरणाचा स्वदेशी कार्यक्रम स्वावलंबन दोन याचा आरंभ केला. नौदलात नवोन्मेष आणि स्वदेशीकरण संघटनेच्या नवी दिल्लीतील 'स्वावलंबन' या चर्चासत्रात या कार्यक्रमाचा आरंभ करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यापासून स्वावलंबनाला सर्वोच्च प्राधान्य देत आहे. देशाला संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी बनवण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं यावेळी राजनाथ सिंह यांनी सांगितलं. सरकारच्या धोरणांमुळं देश आता संशोधन आणि विकासात वेगानं पुढं जात आहे, असंही ते म्हणाले. यावेळी त्यांनी स्वदेशी बनावटीच्या 98 नव्या वस्तूंची पाचवी यादीही प्रसिद्ध केली.

**खादी**

गांधी जयंतीनिमित्त दिल्लीतील कॅनॉट प्लेस इथल्या खादी भवनानं खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांची सर्वाधिक दीड कोटी रुपयांची विक्री नोंदवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या 'मन की बात' कार्यक्रमात केलेल्या आवाहनामुळं खादीची विक्री वाढली असून, त्यांच्या आवाहनाचा जनतेवर मोठा प्रभाव पडला असल्याचं खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी सांगितलं. भारतीय खादी ही  आत्मनिर्भर भारत अभियानाची अग्रदूत बनली आहे, असंही ते म्हणाले.

**आप -खासदार संजय सिंग यांना अटक**

सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीनं काल दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणी आम आदमी पक्षाचे राज्यसभेतील खासदार संजय सिंग यांना अटक केली.

संजय सिंग यांना नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी छापा टाकल्यानंतर अटक करण्यात आली. या प्रकरणी अटक करण्यात आलेले ते आपचे तिसरे नेते आहेत. यापूर्वी, आपचे सत्येंद्र जैन आणि मनीष सिसोदिया यांना अटक करण्यात आली आहे. आता रद्द करण्यात आलेल्या दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये अनियमितता केल्याच्या आरोपावरून या तिघांना अटक करण्यात आली आहे.

**खासदार अपात्र**

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार पी. पी. फैजल यांना लोकसभेतील सदस्यत्वासाठी अपात्र घोषित करण्यात आलं आहे. हत्येचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्याप्रकरणी फैजल यांना सुनावण्यात आलेली शिक्षा स्थगित करण्यास केरळ उच्च न्यायालयानं नकार दिल्यानं हा निर्णय घेण्यात आल्याचं लोकसभा कार्यालयानं म्हटलं आहे. लक्षद्विप मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आलेले फैजल यांचं

सदस्यत्व त्यांना शिक्षा झालेल्या दिवसापासून म्हणजे यावर्षी 11 जानेवारीपासून रद्द करण्यात आल्याचं लोकसभा कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

**नोबेल**

यंदाचं रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक क्वांटम डॉट्सचा शोध आणि संश्लेषणासाठी तीन शास्त्रज्ञांना देण्यात आलं आहे. फ्रेंच-अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ मौंगी जी बावेंडी, अमेरिकन लुईस ई ब्रुस आणि रशियन वंशाचे ॲलेक्सी अकिमोव्ह अशी या तीन शास्त्रज्ञांची नावं आहेत. क्वांटम डॉट्स या नॅनोकणांचे गुणधर्म त्यांच्या आकारानुसार निर्धारित केले जातात. त्यांच्या शोधामुळं क्यूएलईडी टेलिव्हिजन आणि एलईडी दिव्यांच्या तंत्रज्ञानामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. हे नॅनो कण आकर्षक रंगसंगती तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्याचबरोबर नॅनो तंत्रज्ञानाचे हे सर्वांत लहान घटक ट्यूमर काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियेत शल्यचिकीत्सकांना मार्गदर्शन करतात, अशी माहिती नोबेल पारितोषिकाच्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**सिक्कीम**

सिक्कीममध्ये ढगफुटीनंतर तिस्ता नदीच्या खोऱ्यातील पाण्याची पातळी वाढल्यामुळं अचानक आलेल्या पुरात पाकयोंग जिल्ह्यात 23 लष्करी जवानांसह 59 लोक बेपत्ता झाले असून, पाच जणांचा मृत्यू झाल्याचं सिक्कीम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे. लष्कराकडून शोध आणि बचाव कार्य सुरू असून, आतापर्यंत एका जवानाला वाचवण्यात यश आलं आहे. त्रिशक्ती तुकडीच्या जवानांनी बेपत्ता झालेल्या सैनिकांचा शोध घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शोध आणि बचाव मोहीम सुरू केली आहे, मात्र संततधार पाऊस, तीस्ता नदीत वेगानं येणारं पाणी आणि अनेक ठिकाणी रस्ते आणि पूल वाहून गेल्यामुळं त्यात अडथळे येत आहेत.

सिंगताम आणि रांगपो सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचं मोठं नुकसान झालं आहे. माळी गाव गृहनिर्माण संकुल; सिक्कीम डिस्टिलरीज, रंगपो पर्यटक माहिती केंद्र आणि गोलितारमधील नेपाळी धर्मशाळा यासह विविध शाळांमध्ये मदत शिबिरं उभारण्यात  आली आहेत. बेपत्ता व्यक्तींच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती देण्यात आली असल्याचंही प्राधिकरणानं म्हटलं आहे. दरम्यान, सिक्कीम आणि उत्तर बंगालमध्ये तैनात असलेले लष्कराचे सर्व कर्मचारी सुरक्षित असून, मोबाईलवरून संपर्क साधण्यात अडथळा येत असल्यानं ते त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधू शकत नसल्याचंही प्राधिकरणानं कळवलं आहे.

**कर्नाटक-दुष्काळ**

कर्नाटकमधील दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक केंद्रीय पथक आज कर्नाटक दौऱ्यावर येत आहे. या पथकाची तीन गटांमध्ये विभागणी करण्यात आली असून, पुढील चार दिवस ते दुष्काळी भागाची पाहणी करणार आहेत. राज्यातील 195 तालुक्यांमध्ये 2 लाख हेक्टर बागायती पिकांच्या नुकसानीसह 42 लाख हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाल्याचा अंदाज असल्याचं कर्नाटकचे महसूल मंत्री कृष्णा बायरेगौडा यांनी याआधी प्रसारमाध्यमांना दिलेल्या माहितीत म्हटलं होतं.

**विश्वचषक**

देशातील क्रिकेटरसिकांचं लक्ष लागून राहिलेली आयसीसी मर्यादीत षटकांची क्रिकेट विश्वचषक स्पर्धा आजपासून सुरू होत आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या सामन्यानं या स्पर्धेची सुरुवात होणार आहे. दोन्ही संघ गेल्या स्पर्धेतील अंतिम फेरीतील स्पर्धक असून इंग्लंड गतविजेता आहे. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं उद्घाटन समारंभ न करण्याचा निर्णय घेतला आहे. भारताचा पहिला सामना रविवारी आठ ऑक्टोबर रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. स्पर्धेतील बहुप्रतिक्षित सामन्यांपैकी एक भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना 14 ऑक्टोबर रोजी अहमदाबाद इथं होणार आहे.

**आशियाई क्रिडा स्पर्धा**

चीनमधील हांगचौ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रिडा स्पर्धेच्या अकराव्या दिवशी काल भारतीय खेळाडूंनी तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कास्यपदकांसह बारा पदकं जिंकली. यामुळं 81 पदकांसह भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत अठरा सुवर्ण, एकतीस रौप्य आणि बत्तीस कास्यपदकं जिंकली आहेत.पुरुषांच्या भालाफेकमध्ये काल नीरज चोप्रानं सुवर्ण, तर किशोर जेनानं रौप्यपदक मिळवलं. चारशे मीटर रिले शर्यतीत पुरुष संघानं सुवर्ण आणि महिला संघानं रौप्यपदक मिळवलं. तर मिश्र सांघिक तिरंदाजीच्या अंतिम फेरीत ज्योती सुरेखा वेण्णम आणि ओजस देवतळे यांनी सुवर्णपदक जिंकलं. हरमिलन बैंस हिनं महिलांच्या आठशे मीटर स्पर्धेत रौप्यपदक, तर अविनाश साबळेनं पुरुषांच्या पाच हजार मीटर धावण्याच्या अंतिम फेरीत रौप्यपदक पटकावलं. आजचा दिवस भारतीय खेळाडूंसाठी एक महत्त्वाचा दिवस असून, पुरुष गटाची मॅरेथॉन फायनल, जू-जित्सू, रोलर स्केटिंग, कुस्ती आणि आदी प्रकारातील सामने होणार आहेत.

**याबरोबरचं हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**